# कमला कॉलेज बेसबॉलमध्ये अजिंक्य

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

चाळीसगाव येथे झालेल्या राज्यस्तरीय १९ वर्षांखालील मुलींच्या बेसबॉल स्पर्धेत येथील कमला कॉलेजच्या संघाने पुणे विभागाचे नेतृत्व करत गतविजेत्या सोलापूर संघाला २-१ असे नमवत अजिंक्यपद पटकावले. संघाच्या तेजस्विनी पाटील, रोहिणी माळी यांची गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

तत्पूर्वी उपांत्य फेरीसाठी झालेल्या सामन्यात लातूरचा १२-० असा धुव्वा उडवला. तर, चाळीसगाव संघाचा ६-१ असा एकतर्फी पराभव केला.

कमला कॉलेजच्या संघात रोहिणी माळी (कर्णधार), माधुरी दांगट, सुस्मिता पाटील, तेजस्विनी पाटील, रसिका शिरगावे, भारती दांगट, प्राजक्ता चौगुले, धनश्री कोळी, पुजा मोरे यांचा समावेश होता. संघाला डॉ. सुनीता काळे, साधना माने यांचे मार्गदर्शन मिळाले. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी संघाचे अभिनंदन केले.

Scanned by CamScanner